महासंघाची उद्दिष्टये:-

१) शेतमालाच्या विक्रीची व्यवस्था करणे.

२) शेतीमाल खरेदी करणे व विक्री करणे आणि त्याचप्रमाणे शेतकऱ्यांना लागणारी अवजारे खरेदी करणे व विक्री करणे.

३) शेतीमाल व इतर आवश्यक वस्तूची आयात निर्यात स्वत: अगर सभासद संस्था किंवा शासन यांच्यातर्फे करणे तसेच आंतरराज्य व्यापार हाती घेणे व वाढविणे.

४) महाराष्ट्र राज्याच्या बाहेर व्यापार धंद्यासाठी शाखा, कार्यालय विक्री भांडार अथवा एजन्सी उघडणे.

५) मालाची विक्री आणि बी-बियाणे, रासायनिक खते, अवजारे व शेतीची यंत्रसामुग्री यांचा पुरवठा करणे इ.कार्ये स्वत: किंवा सभासद संस्थेमार्फत एजंट म्हणून काम करुन घेणे.

६) मालाचा साठा करणे, त्याची विक्री करणे आणि अनुज्ञप्तीधारक म्हणून व्यापार करणे सुलभ व्हावे यासाठी गोदाम शीतगृह भाडयाने देणे किंवा घेणे.

७) पणन व प्रक्रिया करणाऱ्या संस्थेच्या बाजारपेठ व व्यापार कार्यक्रमात सुसुत्रता आणणे आणि वाढ करणे आणि सहकारी पणन संघटनेची एकात्म रचना करण्याच्या दृष्टीने राज्यातील संस्थांना सेवा उपलब्ध करुन देणे आणि मार्गदर्शन करणे.

८) बाजारपेठेच्या माहितीचा प्रसार करणारे केंद्र म्हणून काम करणे.

९) सदर उपविधी रद्द करण्यात आलेली आहे.

१०) सभासदांसाठी खरेदी-विक्री करणारी मध्यवर्ती एजन्सी म्हणून काम करणे.

११) संचालक मंडळ वेळोवेळी ठरवील त्या अटीवर सभासद संस्थांबरोबर किंवा त्यांच्या करीता धंदा करणे आणि उद्दिष्ट साध्य करण्यासाठी इतर अनुषंगिक व हितावह गोष्टी करणे.

१२) सभासद संस्थेचा विकास व कार्य यांच्यावर देखरेख ठेवणे, मार्गदर्शन करणे आणि कार्य प्रभावी रितीने, कार्यक्षमतेने व सुरळितपणे चालविण्यासाठी त्यांच्यावर देखरेख ठेवणे व मार्गदर्शन करणे.

१३) संचालकांना सहकार व पणन या क्षेत्राबाबत प्रशिक्षण देणे तसेच फेडरेशनचे कर्मचारी, अधिकारी यांचे प्रशिक्षण हाती घेणे आणि बाजारपेठ संघटनेसाठी कर्मचारी वर्ग पुरविणे.

१४) सहकारी तत्वानुसार संलग्न संस्था व इतर सभासद यांच्या आर्थिक हितात वाढ करणे आणि महाराष्ट्र सहकारी संस्था कायदा, १९६० अगर त्यावेळी असलेल्या इतर सहकारी कायद्यानुसार नोंदणीकृत संस्था चालविण्यात सुलभता आणण्यास मदत करणे.

१५) संलग्न संस्थेकडून माहिती आणि नियतकालिक विवरणपत्रे व लेखा विवरण पत्रे मागविणे आणि जरुर तर अशा लेखा विवरण पत्राच्या प्रसिध्दीची व्यवस्था करणे.

१६) जमीन, इमारती, कायम स्वरुपाच्या बनविलेल्या वस्तू, वाहने, मालकी हक्काने घेणे, विक्री करणे किंवा महासंघाच्या व्यवसायासाठी ती भाडे पट्टयाने अगर भाडयाने देणे.

१७) महासंघाचे कर्मचारी किंवा त्यांच्यावर अवलंबून असणारे यांच्या फायदयासाठी निधी स्थापन करणे, अगर निधी स्थापन करण्यासाठी पाठिंबा किंवा मदत करणे.

१८) केंद्र अथवा महाराष्ट्र शासन अथवा आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे अथवा पणन संचालक, पुणे यांनी आदेश दिल्याप्रमाणे अथवा त्यांच्या पुर्व संमतीने कोणत्याही कायद्याखाली नोंदणीकृत सहकारी संस्था, सार्वजनिक संस्था, महामंडळे अथवा शासन यांच्या वतीने विविध व्यवसायामध्ये एजंट म्हणून काम करणे.

१९) संलग्न संस्था आणि सहकारी संस्था यांच्या भाग-भांडवलात रक्कम गुंतविणे.

२०) महाराष्ट्र शासन, सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था अथवा पणन संचालक अथवा त्यांचे हाताखालील अनय् अधिकाऱ्यांनी एखाद्या (प्रक्रिया व पणन) संस्थेवर मग ती संस्था महासंघाची सभासद असो किंवा नसो, महासंघाची अवसायक अथवा प्रशासक म्हणून नेमणूक केल्यास त्या संस्थेचे अवसायक अथवा प्रशासक म्हणून कामकाज पाहणे.

२१) कायद्यातील तरतुदीनुसार संलग्न संस्थेच्या गाऱ्हाण्यांचा वैयक्तिक किंवा सामुहिकरीत्या विचार करणे आणि जरुर तर प्राधिकारी किंवा सार्वजनिक संस्थासमोर त्यांचे प्रतिनिधीत्व करणे.

२२) महाराष्ट्र राज्यातील शेतकी, सहकारी, पणन व प्रक्रिया संस्था यांना हितकारक असणारे इतर व्यवसाय करणे.

२३) शेतीचा माल व इतर वस्तू यांचा राज्यांतर्गत, देशांतर्गत विदेशांतही अद्यावत आयात व निर्यातीचा व्यापार हाती घेणे किंवा त्यांची वाढ स्वत: किंवा सभासद संस्थांमार्फत करणे.

२४) सभासद संस्था किंवा इतर सहकारी संस्थांसाठी किंवा स्वत:साठी गोदाम व शीतगृह बांधणे आणि साठा करण्यासाठी आणि मालाच्या विक्रीसाठी सुविधा निर्माण करणे व अशा योजनांसाठी नोडल संस्था अथवा सहाय्यभूत संस्था म्हणून कामकाज करणे.

२५) स्वत:साठी प्रक्रिया व उत्पादक घटक स्थापणे आणि सभासद संस्थांना त्यांचे प्रक्रिया घटक चालविण्यासाठी सहाय्य करणे किंवा सभासद संस्थेचे प्रक्रिया घटक स्वत: चालविणे किंवा भागीदारीने चालविणे.

२६) स्वत:च्या व भागधारक संस्थांच्या वापरासाठी विमा एजंट म्हणून काम करणे आणि सभासद संस्था व्यापार धंद्यासाठी एजंट म्हणून काम करणे.

२७) स्वत:साठी किंवा सदस्य संस्थासाठी वटणावळ अग्रेषणासाठी म्हणून काम करणे.

२८) स्वत:साठी किंवा सदस्य संस्थांसाठी मुद्रण घटक स्थापणे, नियतकालिक प्रकाशित करणे आणि सदस्य संस्थांना लेखन सामुग्री पुरविणे.

२९) सहकारी कार्यक्रमाची प्रसिध्दी व प्रचार करणे व योग्य प्रकारचे साहित्य तयार करणे आणि वाटणे. प्रात्यक्षिकासाठी व्यवस्था करणे आणि परिषद चर्चासत्र आणि कार्यशाळा, शिक्षण व प्रशिक्षणासाठी कार्यक्रम आयोजित करणे. राज्य शासनाच्या पूर्व मंजुरीने फेडरेशनच्या व्यवहार व कार्यप्रणाली संबंधी शैक्षणिक सहल आयोजित करणे व त्यात सहभागी होणे.

३०) जमीन संपादन करणे व धारण करणे, विकास करणे त्यावर आवश्यकतेनुसार बांधकाम करणे, कर्ज अग्रीम रक्कम किंवा व्यापार विषयक सौदे यासाठी सुरक्षितता म्हणून इमारती किंवा दुसरी कोणतीही जंगम किंवा स्थावर मिळकत गहाण किंवा तारण गहाण ठेवणे.

३१) कोणतेही कर्ज, आगाऊ रक्कम किंवा व्यापार धंद्यासाठी करावयाचा व्यवहार करण्यासाठी जमीन, इमारती किंवा इतर कोणतीही जंगम किंवा स्थावर मालमत्ता सुरक्षिततेसाठी गहाण किंवा तारण गहाण ठेवणे.

३२) फळफळावळ/ भाजीपाला/ खते/ शेती/ उपकरणे/ यंत्रे/ शेतीशी संबंधित व जीवनावश्यक वस्तुंशी संबंधित व्यवसाय करणे, तसेच पेट्रोलियम प्रॉडक्ट, सभासदांच्या हितासाठी मॉल उभारणे, हॉटेल उभारणे व अन्य कोणताही व्यवसाय करणे.

३३) केंद्र शासन, महाराष्ट्र राज्य शासन व इतर राज्य शासन आणि त्यांच्या अंगीकृत संस्थांना कडधान्य/अन्नधान्ये व बी-बियाणे, किटकनाशके व इतर कोणत्याही साहित्याचा पुरवठा करण्याचा व्यवसाय करणे.

३४) शेतीमालाची स्वत: किंवा “अ” व नाममात्र सभासद संस्थांकडून खरेदी करणे अथवा विक्री करणे.

३५) भागीदारी पध्दतीने अथवा अन्य पध्दतीने निधी उभारण्यासंदर्भात व इतर व्यवसाय करण्यासंदर्भात कार्य करणे.

३६) निधी कलमांतर्गत संस्थेच्या “अ” व नाममात्र सभासदांकडून ठेवी, कर्ज व सुरक्षित ठेवी स्विकारणे.

३७) आदिवासी सेवा सहकारी संस्थांना नाममात्र सभासदत्व देऊन त्यांच्याशी व्यवहार करणे.

३८) सदरचे उद्दिष्ट रद्द करण्यात आलेले आहे.

३९) महासंघाचे उद्देश पूर्तीसाठी व संलग्न सभासदांचे हितासाठी आवश्यक असे कोणतेही कार्य करणे.

४०) पणन महासंघ, खाजगी व्यापारी, व्यापारी संस्था, सभासद संस्था ("अ" व नाममात्र सभासद) इतर सहकारी संस्था, शासन यांच्याबरोबर Back to Back Agreement करुन केंद्र शासन, महाराष्ट्र शासन इतर राज्य शासन, महामंडळे, महासंघ, खाजगी व्यापारी व व्यापारी संस्था यांच्याशी व्यवहार करणे.

४१) महासंघाचे व भागधारक संस्थांचे संचालकांना व अधिकाऱ्यांना सहकारी शिक्षण व प्रशिक्षण देण्याकरीता प्रशिक्षण केंद्र चालविणे.

४२) केंद्र व राज्य शासनाच्या सर्व प्रकारच्या योजनांची शासनाच्या सुचनेनुसार अंमलबजावणी करणे.

*************